॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
Fax : (02462) 215572 OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215294 E-mail: directorboee@srtmun.ac.in

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२६-२७/९७३७ दिनांक : ०१/१०/२०२६

## परीक्षा शुल्क माफीसंबंधीचे अत्यंत महत्वाचे परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.संचालक, सर्व संकुले, प्रस्तुत विद्यापीठ
मा.संचालक, उपपरिसर, लातुर, परभणी, प्रस्तुत विद्यापीठ
मा.प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, प्रस्तुत विद्यापीठ
मा.समन्वय, कै.उत्तमराव राठोड आदिवासी व विकास संशोधन केंद्र, किनवट, प्रस्तुत विद्यापीठ

विषय: दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफ करणे बाबत.
संदर्भ: मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याशी झालेली दिनांक ०१/१०/२०२६ रोजीची ऑनलाईन बैठक.
शासन निर्णय क्रमांक समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दिनांक २५ सप्टेंबर २०२६.

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय बैठकीनुसार सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ च्या परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्र स्वीकारण्याचा अंतीम दिनांक ०७/१०/२०२६ रोजी आहे. मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याशी आज दिनांक ०१/१०/२०२६ रोजी झालेल्या ऑनलाईन बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार निर्णन घेण्यात आला आहे की, जे तालुके महाराष्ट्र शासनाने दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर केलेली आहेत अशा तालुक्यातील महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत अशा परीक्षार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत तोंडी आदेश दिलेले आहे.

शासनस्तरावर झालेल्या चर्चेनुसार आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२६ च्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ज्या परीक्षार्थ्यांची परीक्षा शुल्क स्विकारण्यात आली आहे अशा परीक्षार्थ्यांची परीक्षा शुल्क परत करण्याविषयी शासनाचे स्पष्ट आदेश प्राप्त झाल्यावर मार्गदर्शन करण्यात येईल. तसेच दिनांक ०१/१०/२०२६ नंतर परीक्षा आवेदन पत्र सादर करण्यासाठी जे परीक्षार्थी महाविद्यालयात येणार आहेत अशा परीक्षार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्र विना परीक्षा शुल्क स्वीकारावेत ही विनंती.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव:
मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.